**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः दिपक सदानंद निळगुणकर ,

वयः३१ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः आंबेवाडी, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. माझे घरी मी व माझे आई वडील राहतात. सन २०१७ पासून मी सुर्दशन कंपनी मध्ये नोकरी करतो. सन २०१७ मध्ये मला देवेश लोखंडे याने मला व गणेश मोहीतेला प्रत्येक एक चोरी केलेला मोबाईल फोन विकत दीला होता. त्यावेळी सदर फोन चोरी केलेले असल्याचे आम्हाला माहित नव्हते. त्यानंतर पोलीसांनी आम्हा दोघांना पोलीस स्टेशनला बोलावून त्यासंबंधी चौकशी केली होती. त्यावेळी आम्ही सदरील दोन मोबाईल फोन पोलीस स्टेशनला जमा केले. त्यानंतर पोलीसांनी एका कगदावर सही घेतली. सदर घटनेच्या अनुषंगाने माझेकडे चौकशी केली होती व माझे बयाण नोंदवले होते. मी देवेश लोखंडेला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. (सदर आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे दोषारोप पत्रावरुन दिसून येते.)

०२. देवेश लोखंडेने मला व गणेश मोहितेला विक्री केलेले मोबाईल फोन कोलाड येथील रेल्वे पुलावर उभा राहुन ट्रेन मधील प्रवाशाचे हातातील मोबाईल फोन काठी मारुन पाडायचा असे आम्हाला समजले. देवेश लोखंडे व्यतीरीक्त

त्याचे सोबत इतर कोणी होते किंवा कसे हे मला माहित नाही.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी, गणेश मोहीते, देवेश लोखंडे व राजेश कापरे आंबेवाडी येथील रहीवाशी आहोत, आम्ही एकमेकांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही धरणावर जाउन एकत्र जेवण करायचो. हे म्हणणे खरे आहे की, देवेश लोखंडेने व राजेश रामभाउ कापरे हे कोलाड येथील रेल्वे पुलावर उभे राहुन ट्रेन मधील प्रवाशाचे हातातील मोबाईल फोन काठी मारुन पाडायचा. हे म्हणणे खरे नाही की, राजेश रामभाउ कापरे याला वाचवण्या करीता मी अगोदर खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एन.जी.देशमुख यांचे मार्फत सुरू.**

०४. हे म्हणणे खरे आहे की, घटनेचे वेळी प्रत्यक्ष कोणी काठी मारली हे मला माहिती नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.11.08 15:10:51 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.०८.११.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.